MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## शिराळ येथील साल गड्याने मालकाला घातला पावणे दोन लाखाचा गंडा


आष्टी (प्रतिनिधी)

अनेक महिन्यापासून सालाने ठेवलेल्या एका सालगड्याने मालकाच्या घरातील कपाटात ठेवलेले पावणेदोन लाखाचा ऐवज चोरून नेल्याची घटना १९ जुलै रोजी घडली याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे आष्टी तालुक्यातील शिराळ येथील दत्तात्रय रघुनाथ आजबे यांच्याकडे गेले अनेक महिन्यापासून अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील आबाजी उर्फ आबा भिवा मरकड हा कुटुंबासह सालाने होता १९ जुलै रोजी रात्रीच्या दरम्यान मालकाच्या राहत्या घरातील कपाटात ठेवलेले ५० हजाराची रोकड व एक लाख वीस हजाराचे सोन्याचे दागिने असा एक लाख ७० हजाराचा ऐवज चोरून कुटुंबास निघून गेल्याची घटना घडली या प्रकरणी दत्तात्रय रघुनाथ आजबे यांच्या फिरदीवरून आबाजी उर्फ आबा भिवा मुरकड राहणार काष्टी तालुका श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर याच्यावर २० जुलै रोजी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार फौजदार थोरवे करीत आहेत

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२९९ | सोमवार दि.२२ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -299 | MONDAY DT. 22 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


## महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांना अजित पवारांच्या तर संगीता चव्हाण यांना उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभा राहिला वेळ परंतु अत्याचार ग्रस्त महिला मुलींच्या पाठीशी उभा राहिला वेळ नाही का ?

# उगले सांगतात दोन जण होते घटनास्थळी लोकांनी पकडून ठेवले होते ?




- पोलीस प्रशासन आणि बाल हक्क समितीची मिली भगत उघड दिसत आहे.?
- पेठ बीड पोलिसांनी कोणकोणते कलम पुण्यामध्ये लावले आहेत हे पोलीस प्रशासन मीडियाला का सांगत नाही?
- संबंधित पीडित भोळसर मुलगी ही मागासवर्गीय समाजातली असल्यामुळे ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल व्हायला पाहिजे?
- वाळू मुरूम दगडाच्या खालून शेण खाणारा हनुमंत उगले स्वतःच्या तोंडासह बीड जिल्हा पोलीस प्रशासनाचा तोंड काळ केलं?
- मंग त्या दोन आरोपींवर गुन्हा दाखल का केला नाही अज्ञात आरोपी म्हणून बलात्कार व पोस्कोचा गुन्हा दाखल करण्याचे षडयंत्र पेठ बीड पोलीस स्टेशनच्या मुदिराज उबाळे उगले या त्रिमूर्तींना महागात पडणार?
- उबाळे फौजदार म्हणतात की मी मुलगी आणून पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीएसओ नाईट ड्युटीला असलेले सानप यांच्याकडे सोडली सानप यांना संबंधित मुलांचे नाव माहित असतील सानप यांचा मोबाईल नंबर सुद्धा फौजदार रमेश उबाळे यांनी सायंकाळी बोलताना दिला
- पेठ बीड पोलीस स्टेशनचे पी एस ओ सानप म्हणतात की त्या मुलांची नावे व डायरीला असतील किंवा नसतील मी काय सांगू शकत नाही तुम्ही उबाळे साहेबांना व उगलेनात विचारा?
- महिला बालकल्याण हक्क समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व सदस्य यांनी मुलीची हेळसांड केली पाठपुरावा न करता पोलीस प्रशासनाला पुरावा नष्ट करायला केलं सहकार्य?
- सामूहिक लैंगिक अत्याचारात बीड जिल्हा पोलीस दलाच्या तोंडाला काळीमा फासनाऱ्या पीआय अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत उगलेला निलंबित करा?
- नाईट राउंडला फौजदार रमेश उबाळे व हनुमंत उगले यांनी घटनास्थळी भेट दिली?
- ज्या पोलीस कर्मचारी उगलेनी नराधम आरोपींना सोडून दिलेत त्याच उगलेने फिर्याद दिली
- पोलीस म्हणतात बलात्कार पोस्कोचा गुन्हा दाखल केला परंतु मीडियाला माहिती देण्यास पेठ बीड पोलिसांकडून टाळाटाळ?
- महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर व सदस्य संगीता चव्हाण पक्ष बांधणीच्या कामावर.
- बीड पोलीस स्टेशनचा पोलीस कर्मचारी उगले
  आरोपी सोडून देणाराच पोलीस कर्मचारी झाला फिर्यादी.
- डायल ११२ वर कॉल करून पोलिसांना प्रथम खबर देणाऱ्यास साक्षीदार करा
- चोरांची अफवा असल्यामुळे गस्त घालणाऱ्या लोकांनी यांना पकडून चोप दिला उगले उगले उबाळे म्हणतात मग डायल ११२ वर कॉल गेल्यानंतर पोलीस प्रशासन तिथे कसे काय आले. असे खोटे बोलणाऱ्या अशोक मुदिरात
  फौजदार रमेश उबाळे पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत उगलेला तात्काळ निलंबित करा?
- घटनास्थळावरील व्हिडिओ व नाईट राउंड ला असलेले फौजदार उबाळे व उगले यांनी घटनास्थळी मुलीला पोलीस स्टेशनला आणून ठेवले पण नराधम आरोपींना का सोडले?
- कथित मुलीच्या अधिकृत शारीरिक चाचण्या
  न करता एका अंबाजोगाई येथील मूकबधिर निवासी विद्यालयात नियमबाह्य पद्धतीने स्वाधीन का केले?
- पीडित अल्पवयीन भोळसर मुलीला जिल्हा रुग्णालयात मानसोपचार तज्ञ डॉ ची ट्रीटमेंट घेऊन ॲडमिट का केले नाही व तिला
- बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील महिला सुधारग्रह व बालसुधारगृहांमध्ये का ठेवले नाही तिला अंबाजोगाईला पाठविण्याचे षडयंत्र बालहक्क समितीचे अध्यक्ष सचिव उपाध्यक्ष सदस्य यांचेच का?



पी आय अशोक मुदिराज साहेब व पीएसआय रमेश उबाळे साहेब हनुमंत उगले साहेब उघडा डोळ्यांनी बघा नीट हेच ते दोन नाराधम यांनी तुमचा खिसा गरम केला आणि तुम्ही त्यांना सोडून दिले एसपी साहेब आरोपी असतानाही कर्मचाऱ्यांनी पीआय अशोक मुदिराज सांगतात किती आरोपी नाहीतच नेमकं खरं काय आहे. हे तुम्ही महाराष्ट्र आरंभ कार्यालय यास भेट द्या मी पूर्ण व्हिडिओ पुराव्यासहित दाखवतो मग तरी कारवाई होईल का नाही जोपर्यंत पीडित मुलांना न्याय मिळत नाही तोपर्यंत महाराष्ट्र आरंभ पाठपुरावा करून तिला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही?

**एस पी साहेब अशोक मंदिराज पेठ बीड चे पी आय यांना विचारा पिढीतील अन्याय झाल्यानंतर तिच्या मेडिकल केलं पाहिजे की नाही हे माहीत आहे का नाही त्यांना त्या मुलीचे मेडिकल न करता तिला भाजीमध्ये येतील निवरा केंद्रामध्ये ठेवण्यात आले व त्यानंतर महाराष्ट्र आरंभ यांनी त्या पिढीत मुलीची बाजू मांडल्यानंतर त्या पिढीत मुलीला पोलीस स्टेशनला नेऊन परत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मेडिकल साठी आणले परंतु तिचे मेडिकल न करता तिला आंबेजोगाई येथील प्रायव्हेट मतिमंद होस्टेलला नेऊन ठेवले हे किती पद योग्य आहे हे आपण पीआय अशोक मंदिराज यांना विचारावे?**

बीड /प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर साहेब बीडचे डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे साहेब पुरावा आम्ही देतो संबंधित लोकांचा त्या ठिकाणी डायल ११२ वर गेलेला कॉल आणि त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी उबाळे उगले हजर झाले आणि संबंधित मुलीला व नराधमांना त्या ठिकाणाहून घेऊन गेले एवढे तर मात्र गोष्ट खरी आहे का नाही पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर डीवायएसपी विश्वंभर गोल्डे अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत उगले यांनी सांगावं आणि चोरांची अफवा असणाऱ्या गस्त घातल्या घालणाऱ्या लोकांनी संबंधित पोलीस प्रक्ष उपस्थित केला आहे. परंतु पोलीस प्रशासनाने पुन्हा झोपेच सोंग घेतलं आहे का? दैनिक महाराष्ट्र आरंभ हा पिढीत मुलीस नक्कीच न्याय देईल आमची बहीण म्हणून तिच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभा राहू बीड जिल्ह्यातील दलित समाजाच्या संघटना व मातंग समाजाच्या संघटना यावेळी नक्कीच आवाज उठवतील व महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर व बीड जिल्ह्याच्या कन्या शिवसेनेच्या नेत्या संगीता चव्हाण यांनी मात्र या प्रकरणाकडे कानाडोळा केला आहे प्रकरण त्यांना माहित नाही का व त्यांनी का लक्ष दिले नाही या प्रकरणामुळे महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपालताई चाकणकर व संगीता ताई चव्हाण यांच्यावरवर लोकांचा रोष वाढला आहे. मागासवर्गीय समाजाच्या मुलीवर अत्याचार होत असताना महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकणकर व बीडच्या शिवसेनेच्या नेत्या संगीता चव्हाण या मात्र गप्प बसले आहेत. यांच्याकडे संशयाची सुईने लोक पाहत आहेत यांनी संबंधित प्रकरणावरती आवाज का उठवला नाही व या प्रकरणी त्यांनी उत्तर द्यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

अखेर शेवट अत्याचार करणाऱ्या नराधमाचा फोटो महाराष्ट्र आरंभ पेपरच्या हाती लागला आहे. लवकरच त्यांना जर पोलीस प्रशासनाने कारवाई नाही केली तर करण लोंढे मनसेचे नेते नक्कीच त्यांना चोप देऊन लबाड लांडगा उगले उबाळे पी आय अशोक मुदिराज यांच्यासमोर उभा केल्याशिवाय राहणार नाहीत.?

गेल्या दोन ते तीन दिवसापासून महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांच्यासोबत संपर्क करण्यासाठी त्यांच्या पीएला फोन करतोय परंतु पहिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर फोन उचलत नाहीत तर पीए सांगता की आम्ही कार्यक्रमात बिझी आहोत नंतर बोलणं करून देतो?

बीड जिल्ह्याच्या उद्धव ठाकरे गटाच्या म्हणतात की शिवसेनेच्या नेत्या महिला आयोगाच्या सदस्य संगीता चव्हाण म्हणतात की तुम्ही आम्हाला लेखी द्या मग आम्ही कारवाई करायला पोलिसांना सांगू हा कुठला न्याय आहे संगीताताई पेपरला बातमी आली व्हिडिओ व्हायरल झाले पोलीस स्टेशनला पोस्को अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल होऊन एफ आय आर दाखल झाला मुलीला अंबाजोगाई च्या खाजगी मतिमंद विद्यालयाच्या वस्तीगृहात नेऊन सोडले तरी तुम्ही आणखीन लेखी मागताय का काय कारण ?

पोलीस प्रशासन, महिला आयोगसदस्य, बाल हक्क समिती, या सर्वांनाच लक्ष्मी दर्शन झाल्याची चर्चा नागरिकांमधून?

बीड शहरांमधील नव्हे तर जिल्ह्यामधील बाल हक्क समिती वाचणारे हे फक्त स्वतःचे घर भागविण्यासाठी बाल हक्क समिती व आहेत का काय असा प्रश्न बीड शहरांमधील नवे ते बीड जिल्ह्यातील नागरिकांना पडला आहे एवढे मोठे घटना घडल्यानंतरही बाल हक्क समिती वरली आणखी यांनी झोपेची गोळी खाल्ली का लक्ष्मी दर्शन झाले असे चर्चा जनसामान्यांमधून जोर धरत आहे तरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी बाल हक्क समिती व असलेल्यांची चौकशी करून यांना तडकी फडके बाल हक्क समिती म्हणून कमी करण्यात यावे अध्यक्ष सदस्य व सचिव यांच्या प्रॉपर्टींची चौकशी करून आतापर्यंत एकूण केलेल्या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी जनसामान्य मधून सूरदरीत आहे

पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब साय दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयाला भेट द्या पेठ बीड पोलीस स्टेशनच्या पोलीस कॉन्स्टेबल उगलेच्या तोंडून काय शब्द निघाले हे तुम्हीच ऐका मग कारवाई करा?

डीवायएसपी विश्वंभर गोल्डेनी सांगितले होते रात्री आठ वाजेपर्यंत मला एफ आय आरची पीडीएफ पाठवा परंतु उगले ने अंगात आणलं होतं की जा मी फिर्याद देत नाही डी वाय एपी ला सांगा नाहीतर एस पी ला सांगा खाल्लं सगळ्यांनी आणि भरणार मी एकटाच का म्हणून फिर्यात काळ रात्री उशिरा मध्यरात्री दाखल करण्यात आल्याची चर्चा पेठ बीड पोलीस कर्मचाऱ्यांत ऐकायला मिळत आहे.? तरी डीवायएसपी विश्वंभर गोल्डे साहेब यांनी काल रात्रीचा पेठ बीड पोलीस स्टेशन चा दुपारी साडेतीन ते सकाळी आठ वाजेपर्यंत चा सीसीटीव्ही फुटेज तपासून काल तक्रार दाखल करत असताना किती कर्मचाऱ्यांसोबत पोलीस स्टेशनमध्ये संवाद केला याचीही सखोल चौकशी करावी पोलीस स्टेशन चा कॉन्स्टेबल उगले याने काल त्याच्या फोनवरून कोणाकोणाला संपर्क केला याचीही सखोल चौकशी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोरडे यांनी सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच पोलीस कर्मचारी पेठ बीड पोलीस ठाण्यात वादग्रस्त ठरलेला हनुमंत उगले याच्या फोन कॉल च्या गेल्या पाच सहा दिवसापूर्वी पूर्वीच्या सर्व डिटेल्स तपासून त्याच्यावरती निलंबनाची कारवाई करून त्यासोबत पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे व पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत उगलेला तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे?

डी वाय एसपी विश्वाभर गोल्डे साहेब आपल्या हद्दीमध्ये येणाऱ्या पेठ बीड पोलीस स्टेशनवर आपलं नियंत्रण आहे का असा प्रश्न बीड शहरातील नव्हे तर जिल्ह्यातील नागरिकांना पडला आहे कारण की अल्पवयीन मुलीवर अत्याचार होऊन त्या ठिकाणी घटनास्थळी दाखल झालेले पीआय पीएसआय रमेश उबाळे हनुमान उगले हे जागेवर घटनास्थळी असतानाही आरोपी त्यांच्या समक्ष त्यांना पाहिले तरीही त्या आरोपींना त्यांनी सोडून दिले आणि त्याच प्रकरणांमध्ये फिर्यादी म्हणून हुशार उगलेला फिर्यादी केलं असता हुशार उगलेने आपल्या अकलेचे तारे तोडून आज्ञा इसमाच्या व्यक्तीच्या आज्ञातांच्या नावाने फिर्यादी दिली आहे अशी माहिती एपीआय उबाळे यांनी दैनिक महाराष्ट्र आरामशी बोलताना माहिती दिली?

# परळीच्या बरोबरीने बीडला निधी देणार-ना.धनंजय मुंडे

## बीडमध्ये प्रवक्तेपदी निवडीबद्दल धनंजय मुंडेंचा डॉ.योगेश क्षीरसागरांनी केला सत्कार

बीड (प्रतिनिधी)

लोकसभेत पराभव झाला असला तरी जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबध्द आहोत. जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्व जागा महायुती जिंकणार आहे. पूर्वी मुख्य लढत परळीची असायची, आता ती बीडची असेल. जिल्ह्यात सर्व घटकांसाठी भरीव निधी दिला. यापुढे परळीला जेवढा निधी येईल, त्या बरोबरीने बीडला दिला जाणार आहे, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी निवडीबद्दल पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचा सत्कार आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश सोहळा बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि.२०) सायंकाळी १० वाजता उत्साहात झाला. यावेळी सत्कारमूर्ती म्हणून ना.मुंडे हे बोलत होते.

व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्याक सेलचे बीड जिल्हाध्यक्ष इकबाल सय्यद, जिल्हा संघटक सिद्दिकी सादेक, माजी सभापती काकासाहेब जोगदंड, नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक जैतुल्ला खान, बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, बाळासाहेब गुंजाळ, ड.विकास जोगदंड, शुभम धूत, सय्यद इलियास, मुन्ना इनामदार, प्रेम चांदणे, रविंद्र कदम, सरपंच अमोल बागलाने आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक आघाडीच्यावतीने विशाळगड प्रकरणी ना.धनंजय मुंडे यांना निवेदन दिले.

पुढे बोलताना ना.धनंजय मुंडे म्हणाले, राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत होत आहे. लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर बीडमध्ये पहिलाच कार्यक्रम होत आहे. तो पराजय जिव्हारी लागणारा असून त्यावर मात करायची असेल तर आगामी निवडणुकीतील विजय सुनिश्चित करावा लागेल. मी पुरोगामी कार्यकर्ता असून कधीही जात-पात पाहिली नाही, मला ही स्व.गोपीनाथ मुंडे यांनी शिकवण आहे. तरीही आमची जात पाहून पराभव केला. हे आगामी राजकारणासाठी चांगले नाही. त्यामुळे आता तरी विकासावर निवडणुका व्हाव्यात, आपल्या भागातून विकास करण्याची क्षमता असलेल्या नेतृत्वाला



संधी द्यावी. आजपर्यंत अनेक निवडणुका पाहिल्या, परंतु एखाद्याला पाडायचे म्हणून झालेली ही लोकसभेची निवडणूक झाली. तरीही मोठे मताधिक्य दिल्याबद्दल जनतेचे आभार मानतो. ना.अजित पवारांनी ऐतिहासिक अर्थसंकल्पातून लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आहे. या योजनेची नोंदणी करण्यात राज्यात बीड जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. हा आर्थिक लाभ रक्षाबंधनापूर्वी थेट खात्यात जमा होणार आहे. पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या योजनेत अधिकाधिक नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. शासनाच्या अशा योजनांचा लाभ देण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर हे प्रयत्नशील असतात. यासोबतच त्यांनी ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रोजगार मेळावा, आरोग्य शिबिरासह इतर सामाजिक उपक्रमांचे तोंडभरून कौतुक केले. प्रास्ताविक डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार नवगण संस्थेचे संचालक आमेर काझी यांनी मानले.

**डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधानसभा उमेदवारीचे संकेत**

जिथे ज्या पक्षाचा आमदार, ती जागा त्याच पक्षाची असे सुनिश्चित झाले आहे. त्यामुळे उर्वरित जागांची वाटाघाटी होईल. अद्याप माझीही परळीची उमेदवारी जाहीर झालेली नाही. त्यामुळे योग्यवेळेला योग्य उमेदवाराची घोषणा होईल, असे ना. मुंडे यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे नजर रोखून वक्तव्य केले. त्यामुळे एकप्रकारे त्यांनी उमेदवारीचे संकेत दिले आहेत.

**माजी मंत्री, आमदार समर्थकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश**

नाळवंडी गणाचे पंचायत समितीचे माजी सदस्य अच्युतराव शेळके, मुस्लिम समाजाचे नेते सय्यद जकी, रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे एससी सेलचे बीड तालुकाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे, वांगीचे सरपंच अशोक वाघमारे, पिंपळगावचे उपसरपंच संतोष तेलप, रुईगव्हाणचे ग्रा.पं.सदस्य बालाजी नाईकवाडे, लिंबारुईचे युवराज ठाणगे, माजी नगरसेवक सुनील महाकुंडे, अंजनवतीचे उपसरपंच आप्पा मोरे, सदस्य पांडुरंग येडे, लोणीघाटचे माजी सरपंच भास्कर जाधव, काळेगाव हवेलीचे सरपंच भारत कानाडे, भोई समाज संघटनेचे अध्यक्ष दत्ता गुणवंत यांच्यासह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि आमदार समर्थक असलेल्या कार्यकर्त्यांनी रा.काँ.पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वागत केले.

# पारगाव(घु)येथे कायदेविषयक शिबिर संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी)

दिनांक २०/०७/२०२४ रोजी पारगांव घुमरा येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांचे संयुक्त विदयमाने बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा २०१५, बालकांचे हक्क, बेटी बचाओ बेटी पढाओ, शिक्षणाचा अधिकार, लोकअदालत माहिती ई. कायदे विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा दरम्यान पाटोदा न्यायालयात दिनांक २७/०७/२०२४ रोजी होणा-या लोक अदालतचे पॉम्पलेट वाटप करुन व दिनांक २७/०७/२०२४ ते ०३/०८/२०२४ रोजी होणा-या विषेश लोक अदालतचे पोस्टर प्रसिद्ध करुन जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा श्रीमती एस.एन.निकम मॅडम




यांनी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा २०१५, बालकांचे हक्क या विषयी मार्गदर्शन केले व मा. सह दिवाणी न्यायाधीश पाटोदा श्रीमती ए.ए.पाटील मॅडम यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ, शिक्षणाचा अधिकार या विषयी मार्गदर्शन केले. तसेच पाटोदा वकील संघाचे विधीज्ञ श्री.आर. जी.औटे यांनी लोकअदालत बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कायदेविषयक शिबिराचे प्रास्ताविक व सूत्र संचालन विधीज्ञ श्री एस.एन. घूमरे यांनी केले. सर्वाचे आभार विधीज्ञ श्री एस.बी.जावळे मानले . या कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ श्री एस. एस.कोठेकर साहेब, विधीज्ञ श्री यू.बी.जाधव,विधीज्ञ श्री ए.एस. वैद्य,विधीज्ञ श्री बी.डी.तळेकर, विधीज्ञ श्री एस.एन.घूमरे,विधीज्ञ श्री एस.बी जावळे,विधीज्ञ श्री एस.बी.थोरवे,विधीज्ञ श्री बी.बी. जावळे ,विधीज्ञ श्री टी.डी. जाधव विधीज्ञ महेश बेदरे व पाटोदा वकील संघाचे सदस्य, विस्तार अधिकारी गोड़े साहेब, गावातील सरपंच घुमरे मैडम, ग्रामसेवक नागरगोजे साहेब,गावतील नागरीक या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित होते.



वसुंधरा सेवा प्रतिष्ठान आयोजित नवीन मतदार नोंदणी शिबिर प्रभाग क्रमांक ०५ धाकटे देवघर देशपांडे गल्ली अंबाजोगाई येथे संपन्न झाले. यावेळी शिबिरास युवानेते मा.अक्षय भैय्या मुंदडा यांनी भेट दिली व प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्या सोबत संवाद साधला.




रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी पदग्रहण व रोटरी भुषण पुरस्कार वितरण सोहळा २०२४-२५ कार्यक्रमात स्व.विमल ताई यांना घोषित करण्यात आला होता तो पुरस्कार स्वीकारताना युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा व जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी व इतर.

# एस.एम.युसूफ़ यांचा मुक्तपत्रकार राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मान

बीड (प्रतिनिधी)

उस्मानाबाद जिल्ह्यातून प्रकाशित होणारे दैनिक प्रभास केसरी कडून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी बीड शहरातील हॉटेल अन्विता हॉलमध्ये दैनिकाच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्ताने पुरस्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यात एस.एम.युसूफ़ यांना मुक्तपत्रकार राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



एस.एम.युसूफ़ यांना गेल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात आतापर्यंत चंपावतीरत्न पुरस्कार, मातृभूमी प्रतिष्ठानचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार, जिज्ञासा सेवाभावी संस्थेचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, पद्मपाणी प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार, निर्भीड पत्रकार संघाचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी दैनिक प्रभास केसरी या दैनिकाकडून दिनांक २१ जुलै २०२४ रविवार रोजी बीड शहरातील हॉटेल अन्विता येथे वृत्तपत्राच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्ताने पुरस्कार समारंभ घेण्यात आला. यात एस.एम.युसूफ़ यांना मुक्तपत्रकार राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी हा पुरस्कार सपत्नीक स्वीकारला. एस.एम.युसूफ़ यांनी गेल्या दहा वर्षाच्या पत्रकारिता क्षेत्रातील कारकीर्दीमध्ये आतापर्यंत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आदी विषयांवर १०० च्या वर लेख तसेच हजारो बातम्या लिहिल्या आहेत. आजही त्यांचे कार्य अविरतपणे सुरू आहे. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन संपादिका प्रा. अनुप्रिता मोरे तथा मार्गदर्शक रमेश लांडगे यांनी त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले. या कार्यक्रमाचे आयोजन दैनिक प्रभास केसरीचे बीड जिल्हा प्रतिनिधी अण्णासाहेब साबळे आणि संपादिका अनुप्रिता मोरे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे होते तर ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार, दैनिक तामिरचे ज्येष्ठ संपादक काज़ी मखदूम, प्रा.डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, दैनिक समर्थ राजयोग चे संपादक वैभव स्वामी, साप्ताहिक शिव वाणी च्या संपादिका शेख आयेशा बेगम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आषाढ पौर्णिमा वर्षावास प्रारंभ व धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीडच्या वतीने महाविहार धम्मभूमी - डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, मौजे शिवणी, ता. जि. बीड येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आषाढ पौर्णिमेच्या निमित्ताने धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याच पौर्णिमापासून वर्षावासाला प्रारंभ होतो, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्षावासाचा प्रारंभ होत असून याच काळात धम्म उपासक-उपासिका यांना यथायोग्य प्रकारे धम्माचरण करून पुण्य संपादित करता यावे, यासाठी सातत्यपूर्वक सम्यक वाणीतून पूज्य भदंत यांच्या माध्यमातून उपासकांना धम्मदेसना दिली जाते.

प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमाप्रमाणे रविवार दिनांक २१ जुलै २०२४ रोजी आषाढ पौर्णिमाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी १० वाजता ऐतिहासिक बोधिवृक्षाची पूजा, १०ते १२ या वेळेत भोजनदान व खीरदान,१२ वाजता त्रिशरण-पंचशील- बुद्ध वंदना व १२:३० वाजता उपस्थित सर्व पूज्य भिक्खू संघाचे स्वागत व धम्मदेसना, पाहुण्यांचे सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी प्रमुख धम्मदेसना पूज्य भिक्खु शांतिदुत थेरो (छत्रपती संभाजीनगर)देणार आहेत नागपुर येथील पु.भिक्खु धम्मसेवक हे वर्षावासाचे अधिष्ठाण करणार आहेत.



तर यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आयु. संतोष दिलीप गायकवाड (सामान्य प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड.) कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून आयु.अभिषेक साळुंखे (व्याख्याते तथा उपसंपादक- प्रजापत्र बीड) आयु. कोमल मस्के ( व्याख्याता तथा सामाजिक कार्यकर्त्या, बीड.) हे लाभणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक- पूज्य भिक्खू धम्मशील थेरो (सचिव, प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड.) यांची धम्मदेसना सुश्रवण करण्यास लाभणार आहे.

उपस्थित सर्व धम्म उपासक-उपासिका, बालक-बालिका व धम्मप्रेमी यांना मौजे घाटसावळी येथील समस्त बौद्ध उपासक- उपासिका यांच्यावतीने भोजनदान व खिरदान देण्यात येईल. तरी नियोजित कार्यक्रमास सर्व उपासक - उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक पूज्य भिक्खु धम्मशील थेरो,बीड., प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड, वर्षावास नियोजन समिती मौजे शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका यांनी केली आहे.



**बीड (प्रतिनिधी)**

**पेठ बीड भागातील सामाजिक कार्यकर्ते आदर्श कपाळे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश केला.या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश केला.या प्रसंगी विलास बडगे,प्रा सनी वाघमारे,सागर धन्वे,शुभम धन्वे,गोटू पायके,रमेश गाताडे,साळवे सर,मस्के,बंडू निसर्गंध, विशाल दोडके,आदींची उपस्थिती होती.प्रसंगी पेठ बीड भागातील असंख्य कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.या प्रसंगी ओंकार कपाळे,मंगेश बहिरागी,अक्षय साळूंके,दिपक साळवे आर्पीत लोखंडे,आदीसह कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.**




## किशोर वीर यांना आयआयटी तिरुपती येथून पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी प्रदान

बीड (प्रतिनिधी)

आयआयटी,भारतीय प्रौद्योगिक संस्थान तिरुपती, येथून किशोर बबन वीर यांना पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी मिळाली. तसेच त्यांची वर्ल्ड रिसॉर्स इन्स्टिटयूट मध्ये जुनिअर प्रोग्राम असोसिएट म्हणून निवड झाली आहे. थठख हि संस्था पूर्ण जगात मानव कल्यानासाठी काम करते. बीड शहराजवळील एका छोट्याशा कर्झणी गावातील बबन वीर यंच्या शेतकरी पुत्राला हा मान मिळाला आहे. शैक्षणिक अभ्यास, जिद्द, चिकाटी, एकाग्रता व काहीतरी करण्याची ज्यांच्यामध्ये धमक असते. त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून या छोट्याशा ग्रामीण भागातील विद्यार्थ्याकडे पाहिले जात आहे. त्याचा आदर्श सर्वांनी घेणे आवश्यक आहे. त्याचे कर्झणी गावात सर्व स्तरातून कौतुक व स्वागत,अभिनंदन होत आहे.



दि.०९/०८/२०२४ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या मेळावा संदर्भात गेवराई तालुक्यामध्ये प्रहार जनशक्ती पक्षाची तालुकास्तरीय बैठक संपन्न झाली या बैठकीला उपस्थित असणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विलास (भाऊ) काळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक संपन्न झाली. या बैठकीचे नियोजन प्रहार जनशक्ती पक्ष गेवराई तालुका अध्यक्ष अर्जुन (भाऊ) सुतार यांनी केले होते ,तसेच उपस्थित असणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष निजाम खा पठाण, अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष शेख इब्राहिम भाई ,तालुका युवक अध्यक्ष अजय (भैय्या) डोंगरे ,तालुका उपाध्यक्ष विशाल पौळ, माजलगाव तालुका युवक अध्यक्ष अविनाश ढगे, गेवराई *शहराध्यक्ष शेख भाई राजा, सुरेश गायकवाड पोपटराव कानडे, बाळासाहेब सुतार ,तालुका उपाध्यक्ष अनिल माने गेवराई तालुक्यातील विविध गावातील मोठ्या प्रमाणामध्ये महिलांनी विशेष उपस्थिती दर्शविली.

# स्वाराती रुग्णालयातील रुग्णाच्या समस्या बाबत पत्रकार अभिजीत लोमटे यांचे आमरण उपोषण :प्रशासन दखल घेणार का?

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील रुग्णाच्या विविध समस्या बद्दल अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे आज पासून आमरण उपोषणास बसले असून या उपोषणास वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (उबाठा) यांनी पाठिंबा दर्शवला आहे.स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरीब रुग्णांची जीवन संजीवनी मानली जाते मात्र येथे मागील काही महिण्यापासून रुग्णाचे हेळसांड होत असून रुग्णांची प्रचंड लूट केली जात आहे.अति दक्षता वार्डात जाण्यापूर्वी देवासमोर काही कर्मचारी पैसे ठेवायले सांगतात डिस्चार्ज होताना कर्मचाऱ्यांना पैसे द्यावे लागतात अद्यावत ब्लड बँक असताना शहरातील बाहेरच्या लॅब वाल्याकडे रक्त तपासणी साठी पाठवले जाते विशेषत: त्यांनी सांगितलेल्या लॅब मध्येच जावे लागते किंबहुना



इतर लॅब चा रिपोर्ट आणला तर ते पाहतही नाही परिणामी रुग्णांना आर्थिक लुटिचा सामना करावा लागतो. ठराविक औषध वगळता बहुतांश गोळया औषधे बाहेरच्या मेडिकल वरून घ्यावी लागतात दवाखाना चे प्रधानमंत्री जनऔषधी मेडिकल हे नावालाच असून औषध विक्री मात्र इतर मेडिकल च्या भावाने होत असून इथेही रुग्णांची लूट होत आहे त्याच बरोबर येथील शासकीय सेवेत असणारे डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस बंद कराव्या. स्वाराती रुग्णालयातील रुग्णांची हेळसांड व लूट थांबवण्याकरता अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे आज दिनांक २२ जुलै सोमवारपासून उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले असून अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषदेचे पत्रकार सतीश मोरे,सय्यद नईम,मोहम्मद फैजान गजानन चौधरी,आरेफ सिद्दीकी, उत्तरेश्वर शिंदे, अहमद पठाण,योगेश डाके आदी डिजिटल मीडिया परिषदेचे सदस्य उपस्थित आहेत.या उपोषणास शिवसेना केज विधानसभा प्रमुख मदनलाल परदेशी तसेच वंचित बहुजन आघाडी चे शहराध्यक्ष गोविंद मस्के यांनी पाठिंबा दिला आहे.प्रशासन या आंदोलनाची दखल घेत काय कारवाई करणार हे अगामी काळात पाहावे लागेल.

# यशवंती आधार सामजिक संस्था व इंद्रायणी सेवा फाउंडेशनच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

**बीड (प्रतिनिधी)**

**यशवंती आधार सामजिक संस्था व इंद्रायणी सेवा फाउंडेशन च्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न झाले रक्तदान सर्वश्रेष्ठ दान,पाणी हेच जीवन त्याप्रमाणेच रक्त हेच जीवन आहे. सध्या डेंगू मलेरियाचे पेशंट मध्ये भयानक वाढ झाल्याने रक्तपुरवठा सध्या फार कमी आहे त्यामुळे आपण दरवर्षी पावसाळ्या सुरू होतात जुलै महिन्यात गुरुपौर्णिमेच्या निमित्त रक्तदान शिबिर घेत असतो आणि त्या शिबिरामध्ये उत्स्फूर्त प्रतिसादाने रक्तदाते दातृत्व देऊन रक्तपुरवठ्याची पूर्तता करतात**



यशवंती आधार सामाजिक संस्था पुणे महाराष्ट्र राज्य व इंद्रायणी सेवा फाऊंडेशन,आळंदी देवाची यांच्या संयुक्त विद्यमानाने, गुरुपौर्णिमे निमित्त भारतमातेचे माजी सैनिक, शौर्यचक्राचे मानकरी, स्व. श्री. गोविंदराव सखाराम पानसरे यांच्या तृतिय पुण्यस्मरणार्थ व कै. गं. भा. तुळसाबाई नामदेव पितळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य रक्तदान शिबीर रविवार दि. २१ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वा. रक्तदात्यांना एक्सीडेंट पॉलिसी पाच लाखाची देण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे मा.डॉ. उत्तम माटे सर यशवंत संघर्ष सेनेचे सस्थापक विषुभाऊ कुऱ्हाडे , प्रसिध्द सेवाभावी उद्योजक मा.श्री. प्रकाशशेठ पानसरे, आधार ब्लड बँक चे संचालक मा.श्री.मकरंद शहापुरकर, आळंदी नगरपरिषद चे मा.नगरसेवक ज्ञानेश्वर रायकर, नेत्र तज्ञ डॉक्टर क्षीरसागर या वेळी पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, ग्रंथ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.हा रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आराधना गार्डन रेस्टॉरंट येथे संपन्न झाला याकार्यक्रमाचे मुख्य संयोजक यशवंती आधार सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश बाबासाहेब दिवटे, इंद्रायणी सेवा फाऊंडेशन चे अध्यक्ष विठ्ठल शिंदे वैभवी मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल चे संचालक डॉ.सुनिल वाघमारे साहेब, आदर्श पत्रकार श्री.दिनेशजी कुऱ्हाडे, इंद्रायणी सेवा फाऊंडेशन उपध्यक्ष श्री.शिरीषजी कारेकर राज्य सोशल मीडिया प्रमुख.श्री.जनार्दन पितळे साहेब इत्यादी मान्यवरांच्या संयोजनाने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला

# बीड जिल्हा पत्रकारितेची पंढरी- वसंत मुंडे, प्रदेशाध्यक्ष पत्रकार संघ

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचा विचार करता बीड जिल्ह्यात सर्वात जास्त प्रिंटेड आणि डिजिटल वृत्तपत्र आहेत. खरं पाहता बीड जिल्हा ही पत्रकारितेची पंढरी आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही असे वक्तव्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दैनिक प्रभास केसरीच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त केले. यावेळी विचार मंचावर पार्श्वभूमीचे उपसंपादक प्रा. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, साप्ताहिक शिव वाणीच्या संपादिका आयेशा शेख, उर्दू दैनिकचे संपादक काझी मगदूम साहेब, ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तम पवार आणि कालिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कंधारे उपस्थित होते.

यावेळी प्रा. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी वृत्तपत्राचा इतिहास सांगत लोकशाहीचा चौथा स्तंभ आजही खंबीर उभा असल्याचे स्पष्ट केले. उर्दू दैनिक चे संपादक काझी मगदूम सहाब यांनी दैनिक प्रभास केसरी वृत्तपत्रास शुभेच्छा देत वृत्तपत्र हे एकांगी विचार न करता स्पष्ट आणि सत्याचा विचार घेऊन चालणारे शस्त्र आहे असे म्हटले तर दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी वृत्तपत्र चालवताना येणाऱ्या अडचणी विषद करत




अनेक वृत्तपत्र मोठ्या कष्टाने उभे असल्याचे म्हटले. यावेळी विचार मंचावर उपस्थित असलेले कालिका देवी महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास कंधारे यांनी वृत्तपत्राचा मागोवा घेत वृत्तपत्र मानवी स्वभावाचा अविभाज्य अंग बनले असल्याचे विशद केले. अध्यक्षीय भाषणात बोलताना वसंत मुंडे म्हणाले की, जेवढी लोकसंख्या आहे त्या प्रमाणात आज पत्रकार पाहायला मिळत नाहीत. पत्रकार संघटना चालवत असताना अनेक अडचणींना पत्रकार सामोरे जातो याची जाणीव असल्याचेही ते यावेळी म्हणाले. वर्धापन दिन साजरा करत असतानाच समाजातील महानुभवांचा पुरस्काराच्या स्वरूपामध्ये सन्मान करून त्यांना पुढील काळात ऊर्जा मिळावी या उद्देशाने दैनिक प्रभास केसरीने हाती घेतलेला उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असल्याचेही ते म्हणाले.

दर्पण कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या वर्धापन दिनाची सुरुवात करण्यात आली तर आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार, वृक्षमित्र राज्यस्तरीय पुरस्कार आणि सेवा रत्न राज्यस्तरीय पुरस्कार देऊन आलेल्या महानुभवांचा सन्मान यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अफरोज सय्यद तर आभार बीड जिल्हा प्रतिनिधी अण्णासाहेब साबळे यांनी मानले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रतिनिधी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय समाज पक्षात अनेक कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश-जिल्हाध्यक्ष: अण्णासाहेब मतकर

## पंचायत समिती .जिल्हा परिषद. विधानसभा निवडणूक राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढवणार, जिल्हाध्यक्ष मतकर

बीड (प्रतिनिधी)

आज गुरुपौर्णिमा निमित्त पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे श्री साईबाबा मंदिर या ठिकाणी कार्यक्रमास उपस्थित राहून जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी साईबाबांचा आशीर्वाद घेतला भावी भक्तांना मार्गदर्शन केलं. जिल्हा अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली काही पदाधिकाऱ्यांचा प्रवेश व निवडी यावेळेस घेण्यात आल्या.

राष्ट्रीय समाज पक्षात सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र काम करतात. त्यामुळे सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणारा हा एकमेव पक्ष आहे. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांनी १८ पगड जातींना सोबत घेऊन पक्षाचे गाव कांड्यावर काम वाढून सर्वसामान्य माणसांना न्याय राष्ट्रीय समाज पक्षाने गाव ते शाखा व घर तिथे कार्यकर्ता ही मोहीम हाती घेतली ७० टक्के पक्षाची बांधणी झाली आहे त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवणार आहे. आज सर्वसामान्य




लोकांना प्रस्थापित पक्षावर कुठलाही विश्वास राहिलेला नाही सर्वसामान्य प्रश्न सोडवायचे असतील तर बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेने राष्ट्रीय समाज पक्षाला ताकद देऊन सर्वसामान्य काम करण्यासाठी एक वेळेस राष्ट्रीय समाज पक्षांच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून आणलं पाहिजे मोठे लोक आपले काम करत नाहीत आणि आपण निवडणुका जवळ आले की त्यांचाच ऐकतो त्यामुळे यावेळेस आपणास बदल करण्याची संधी आलेली आहे आणि त्या पण करतील ही अपेक्षा जिल्हाध्यक्ष अण्णा सहमतकर यांनी कार्यकर्त्यांच्या समोर मांडली आहे.

या ठिकाणी काही कार्यकर्त्यांचा प्रवेश घेण्यात आले.

श्रीमती कविता राईस तालुका अध्यक्ष रासपा पाटोदा, श्रीमती सुरेखा बेद्रे तालुका उपाध्यक्ष रासपा पाटोदा, श्रीमती अनिता महारनवर तालुका सचिव रासपा पाटोदा, श्री विकास घुगे अमळनेर सर्कल प्रमुख, श्री अशोक शिंगटे अमळनेर गन प्रमुख, श्री बाळासाहेब आसराची सानप सौताडा गन प्रमुख, श्री मिसाळ गहिनीनाथ व इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. तसेच धनवटे व महानोर यांनी राष्ट्रीय समाज पक्षांच्या जिल्हाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा मानसन्मान केला. त्याबद्दल राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने त्यांचे खूप खूप धन्यवाद.

उपस्थित राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष परशुराम काशीद, तालुका अध्यक्ष पाटोदा आसाराम महानोर युवक तालुका अध्यक्ष पाटोदा कल्पेश भोंडवे , एडवोकेट बाळासाहेब सोलनकर, भाऊसाहेब दिंडे आष्टी तालुका अध्यक्ष आष्टी तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण भिसे, पत्रकार अंकुश गवळी या संस्थेचे चालक धनवटे साहेब तसेच सर्व महिला मंडळ पुरुष मंडळ बहुसंख्येने उपस्थित होते.

# छत्रपतींचे वाघनखे स्वराज्यात ! उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे संभाजी सुर्वेनी मानले आभार

बीड (प्रतिनिधी)

राज्यातील युती सरकारने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक 'वाघनखे' लंडन येथील 'व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम'मधून महाराष्ट्रात आणली. त्या बद्दल राज्याचे लोकप्रिय नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे बीडचे सामाजिक कार्यकर्ते संभाजी सुर्वे यांनी आभार मानले आहेत.

या बाबत सविस्तर असे की,ज्या वाघनखांनी स्वराज्यावर चालून आलेल्या अफझलखानाचा वध केला होता ती ऐतिहासिक वाघनखे सर्व शिवप्रेमींना युती सरकार मुळे दर्शनासाठी उपलब्ध झाली आहेत. आणि वाघनखांचे दर्शन होणार असल्यामुळे प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी जोडले जाण्याची संधी शिवप्रेमींना मिळाली आहे. शिवरायांच्या शौर्याचे प्रतिक असलेल्या वाघनखांचे सातारा येथील शस्त्रसंग्रहालयात शिवप्रेमींना दर्शन घेता येणार आहे.

असुरी शक्तींचा नि:पात करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सामान्य माणसांना, अठरापगड जातीतील लोकांना एकत्र केले. त्यांच्यातील विजिगीषू वृत्ती, पौरुषत्व जागृत करून मुघलांच्या सेनेला




पराजित करून स्वराज्य स्थापन केले. म्हणूनच आमच्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आराध्यदैवत आहेत, युगपुरुष आहेत.शिवरायांकडून प्रेरणा घेऊन महायुती सरकारही महाराष्ट्रातील शेवटच्या माणसाचा विचार करून त्यांच्या उत्थानासाठी काम करत आहे. आजही छत्रपती शिवरायांचे नाव घेतल्यावर प्रत्येकाचे रक्त सळसळते. अशा युगपुरूष शिवरायांनचे वाघनखे स्वराज्याच्या भूमीत आणून इथली भूमी परत एकदा पावन केल्याबद्दल राज्याचे लोकप्रिय नेते देवेंद्रजी फडणवीस यांचे संभाजी सुर्वे यांनी आभार व्यक्त केले.

# ऑल इंडिया पँथर सेनेचा उद्या माजलगाव तहसील कार्यालयावर धडक मोर्चा – पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील दलित, मुस्लिम आदिवासी, मातंग, यांच्यावर वाढ झालेल्या अन्याय अत्याचारावर तात्काळ आळा घालण्यात यावा. दिवसाढवळ्या दलित मुस्लिम आदिवासी मातंग समाजातील लोकांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या क्रूरकर्मी जातिवाद करणाऱ्या वर तात्काळ कायद्याच्या तरतुदीनुसार कडक कारवाया कराव्यात. दीन दुबळ्या गोरगरीब मातंग मुस्लिम आदिवासी दलीत समाजावर क्रुर्ता दाखवणाऱ्या जातीवादी क्रूर करम्यावर तात्काळ कायद्याच्या तरतुदीनुसार कडक कारवाया कराव्यात. अशी ऑल इंडिया पँथर सेना च्या वतीने जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी मागणी केलेली आहे. याच अनुषंगाने तहसील कार्यालय माजलगाव येथे धडक मोर्चा आयोजित केला आहे

राजेगाव येथील बौद्ध शेतमजूर महिलांना मारहाण करणाऱ्या गावगुंडांना तात्काळ अटक करण्यात यावी. पीडित कुटुंबांना तात्काळ संरक्षण देण्यात यावे. अनुसूचित जाती जमाती भूमिहीन शेतमजुरांना दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेमधून जमिनीचे सातबारा नावावर करून देण्यात यावे. बीड जिल्हा दलित अत्याचार ग्रस्त



जिल्हा म्हणून घोषित करण्यात यावा. तरी सर्व बहुजन समाजातील बांधवांनी उद्या ठीक बारा वाजता आपली उपस्थिती दर्शवून मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी व्हावे

# मराठा आरक्षण, तीर्थक्षेत्र निधी साठी २४ तारखेला अमर उपोषण !

## अमर उपोषणा दरम्यान आता मेलो तरी हरकत नाही – रोहन गलांडे पाटील

केज/प्रतीनिधी

मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील हे २० जुलै २०२४ पासून आंतरवाली-सराटी जि. जालना या ठिकाणी आमरण उपोषणास बसणार आहेत.तरी मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे.तरी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या २० तारखे पासुन सुरू होणाऱ्या उपोषणाची दखल घेऊन राज्य सरकारने केलेल्या मराठा समाजाच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात दि.२४/०७/२०२४ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सकाळी १० वाजता रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसणार आहे मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षषासाठी ५० लाख रुपये मंजूर झालेल्या निधीचे वितरण करून श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्राचे काम करु असे लेखी आश्वासना नंतर उपोषणाला स्थगिती देण्यात आली परंतू उपोषणाला स्थगिती देऊन ऐक महीना उलटुन सुध्दा काम सुरू केले नसल्याने



परत २४/०७/२०२४ रोजी अमरण उपोषन सुरू करण्यात येणार आहे जो पर्यंत कामाला प्रेत्येशात कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे .

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मुंडे यांनी लेखी आश्वासन देऊन श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली नाही तरी यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण.

सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ

सोमवार दि.२२ जुलै २०२४
MONDAY DT. 22 JULY 2024



# जय्यत तयारी; दिव्य जागृती संस्थानच्या वतीने परळीत मंगळवारी गुरुपौर्णिमा महोत्सव

## जिल्ह्यातील ५ हजार भक्तांच्या उपस्थितीत रंगणार गुरु पौर्णिमा; २५ वर्षापासूनची कायम

परळी (प्रतिनिधी)

**दिव्य जागृती संस्थानच्या वतीने आज मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परळीत दिव्य ज्योती जागृती संस्थानची गुरूपौर्णिमेची २५ वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिरजवळ असलेल्या हालगे गार्डन येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातून ५ हजार भाविक येणार आहेत. दिव्य जागृती संस्थानच्या वतीने दरवर्षी गुरूपौर्णिमेचा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो.**

त्यानुसार यंदा उद्या २३ जुलै रोजी सकाळपासून विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ९ वाजता भारतीय संस्कृती नुसार वेद मंत्राचे उच्चारण होणार आहे. सकाळी १० वाजता गुरू महाराजांची आरती होईल. १०.३० वाजता सत्संग प्रवचन, भजन होणार आहे. दिल्ली येथील गुरु महाराजांच्या शिष्यांचे यावेळी प्रवचन होणार आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाची जय्यत तयारी केली जात आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त गुरू महाराजांच्या आरतीसह, प्रवचन होणार असल्याने भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. गुरुंचे स्थान प्रत्येक भक्त गणांच्या मनात अढळ आहे. गुरूने दाखवलेल्या मार्गाने चालून जीवनाचा उद्धार करून घेण्याचा प्रत्येकाचा संकल्प असतो. त्याच संकल्पानुसार गुरू प्रती असलेली निष्ठा, प्रेम व्यक्त करण्यासाठी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे बीड जिल्ह्यातील अधिकाधिक गुरू महाराजांच्या भक्तगणांनी गुरू पौर्णिमा उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन दिव्य जागृती संस्थान परिवाराने केले आहे. बीड जिल्ह्यात गुरू महाराजांचे भक्तगण मोठ्या प्रमाणात आहेत. या शिष्यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून गुरु पौर्णिमेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या वतीने गुरू महाराजांचे कार्यक्रम घेतले जातात. गुरु-भक्तांची मोठी परंपरा राहिली आहे.

### महिला, पुरुष भक्तांना बसण्यासाठी कक्ष उभारणी

हालगे गार्डन, परळी वैजनाथ होणार्या गुरु पौर्णिमा उत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्यामध्ये डेकोरेशन, सत्संगाच्या ठिकाणी महिला, पुरुष भक्तांना बसण्यासाठी कक्ष उभारणी, भजन, प्रवचनासाठी स्टेज उभारणी, महाप्रसाद वाटप कक्ष अशी तयारी करण्यात येत आहे. दरवेळीच्या तुलनेत यंदा भक्तगण अधिक संख्येने येणार आहेत.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन धम्म प्रवचन मालीका व ग्रंथ वाचनास प्रारंभ



माजलगाव (प्रतिनिधी)

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे आषाढी पौर्णिमा ते अश्विन पौर्णीमा या वर्षावास कालावधीत आज दि २१जुलै २०२४ वार रविवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचनास व धम्म प्रवचन मालीकेस प्रारंभ करण्यात आला या निमित्ताने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व च्या वतीन राबवण्यात येत आसलेल्या प्रवचन मालीकेतील आषाढी पौर्णिमा व वर्षावासाचे महत्व या विषयावर जिल्हा पर्यटन सचिव आद. के व्ही साळवेसर ,आद.एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे यांनी सखोल मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे नेते अंकुश आण्णा जाधव हे होते मेंनबत्ती प्रज्वलीत करुण भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाची प्रस्तावना वाचन करुन उदघाटन करण्यात आले या कार्यमासाठी जिल्हा महिला सचिवा शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे,माजी जिल्हा सरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान , तालुका अध्यक्ष गुलाब धाईजे,सह शिक्षक सखाराम घनघाव,शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्कार सचिव आशाताई मोरे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभा ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमा साठी मंदाताई साळवे यांनी फलआहार तर विशाखाताई वाघमारे यांनी खिरदान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे, दयानंद साळवे, बाबासाहेब घनघाव,राजेभाऊ साळवे,डी पी पोटभरेआप्पा ,डी पी वाघमारे नाना, मोहन काकडे, विशाल साळवे, माया ताई स्वामी,सुजाता पौळ,पोटभरे ताई,रमाताई राजभोज, तात्यासाहेब साळवे ,नितीन डोंगरे ,सिद्धांत साळवे,वैभव साळवे व भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे मोठ्या उत्साहात गुरूपौर्णिमा साजरी

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन भुमीत श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे प्रतिवर्षी प्रमाणेच यावर्षीही आज दि.२१ रविवार रोजी गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मुर्तीला अभिषेक, श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराजांच्या समाधीची महापुजा करण्यात आली. वारकरी मंडळींच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर महापंगतीच्या प्रसादाचा भाविकांनी आस्वाद घेतला.पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी गुरूपौर्णिमा निमित्त श्रीगुरू ईश्वरबाबा भारती समाधीचे दर्शन घेण्यासाठी व बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज



व शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती.गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व ; गुरूंप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस :- शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज

गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असुन आषाढ महिन्याच्या पोर्णिमेच्या दिवशी गुरूपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो.या दिवशी अध्यात्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील गुरूंप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.आषाढ महिन्यातील पोर्णिमा गुरूपौर्णिमा म्हणून ओळखली जाते.महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीला चार वेदांच ज्ञान दिले.त्यामुळे महर्षी वेदव्यास यांना प्रथम गुरू मानलं गेलं.महर्षी वेदव्यास यांचा जन्म पोर्णिमेच्या दिवशी झाला होता.म्हणुन या पोर्णिमेला गुरूपौर्णिमा म्हणतात.

# गायरानसाठी करचुंडीच्या ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर धरणे आंदोलन

बीड (प्रतिनिधी)

करचुंडी समस्त गावकरी बहुजन बांधव यांचे वतीने करचुंडी गावाला असणारी गायरान जमिनीचे कायदेशीर अधिकार म्हणजे, गावरात जमिन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावाने करणे, ७/१२ उताऱ्यावर त्याची नोंद करणे इत्यादी मागणी करीता ते बीड जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमिनीचा वापर करुन त्यावर अनेक प्रकारचे पीके घेवून आपले कुंटूबाचे पालनपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना या मागणीचा लाभ घेणे करीता दि. २० जुलै पासून ते मागणी मान्य झालेचे लेखी पत्र संबंधित अधिकाऱ्याचे सहीचे मिळेपर्यंत करचुंडी गावातील गरीब दास महाराज सभागृह येथे बेमुदत धरणे आंदोलन जिल्हा अधिकारी कार्यालय समोर सुरू मौजे करचुंडी येथील जमीन नसलेल्या शेतकऱ्यांनी गावालगत असणारी (गायरान) जमीनीवर विविध प्रकारची नगदी पिके घेवून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर या गावचे शेतकरी आपले कुंटूबाचे उदरनिर्वाह पालनपोषण करीत आहे. या गावातील शेतकऱ्यांना शासनाच्या मिळणाऱ्या अनेक सरकारी सुख सुविधा मिळत नाहीत. या




गावातील बरेचसे शेतकरी अल्पभुधारक आहेत.आम्ही समस्त गावकरी करचुंडी येथील गायरान जमीन शेतकऱ्यांच्या नावावर होवून त्या जमिनीचा त्याला ७/१२ उतारा देणेकामी शासन स्तरावर व राजकीय स्तरावर वेगवेगळे पत्रव्यवहार केलेले आहेत. गायरान जमिनीचे कायदेशीर हक्क नसलेमुळे शेतकऱ्यांना शेतीला पुरक दुसरे जोडधंदे नाहीत. ना जमिनीत वीज घेता येते ना शेतकऱ्यांना सोलर पंप दिले जातात. तरी शेतकऱ्यांना अनुदान व पीकविमा योजना देवून या सर्व अडचणीतून बीड जिल्हयातील शेतकरी मुक्त झाला पाहिजे. तो प्रगतीशील शेतकरी झाला पाहिजे. हीच मागणी घेवून समस्त गाव मौजे करचुंडी ता. जि. बीड येथील गरीब दास महाराज सभागृह येथे दि. २०/०७/२०२४ रोजीपासून शेकडो शेतकरी समूहाच्या उपस्थितीमध्ये सकाळी १०.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत आंदोलन सुरु राहणार आहे. सदरचे रॅली आंदोलन हे करचुंडी ते बीड पायी रैली दि. २२/०७/२०२४ रोजी सकाळी ९.०० ते सायं. ५.०० या वेळेत जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमीन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांकरीता असणार आहे. सदरचे आंदोलन हे पुर्णपणे शांततेत व लोकशाही मार्गाने होणार. प्रशासकीय यंत्रणेला कुठलाही त्रास होणार नाही याची आंदोलन शिष्टमंडळाच्या वतीने दक्षता घेतली आहे. आंदोलनामध्ये छोटेखानी भीमगीत गायनाचा व्याख्यान, प्रबोधन इत्यादी तसेच संविधान जनजागृती इत्यादी विषयावर चर्चा होणार आहे. तरी बेमुदत धरणे आंदोलनाला गालबोट लागू नये. सामाजिक शांततेचा भंग होऊ नये करीता आंदोलनाला कुठलेही अडचण येऊ नये करीता पोलीस परवानगी स्पिकर परवाना व पोलीस संरक्षण करीता मागणी करीत आहोत. आंदोलनातील मुख्य मागणी मान्य होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याच सहीचे मागणी मान्य झालेचे पत्र मिळेपर्यंत हे आंदोलन सुरु राहणा बेमुदत धरणे आंदोलनातून मागणी मान्य न झालेस पुढे आंदोलनाची दिशा बद आंदोलन ऐवजी प्रेमनाथ अमर उपोषणाला सुरुवात केली आहे.

# पदोन्नती प्रक्रिया राबवून विषय शिक्षकांच्या जागा भरण्याचे आदेश

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मागणीची दखल

बीड (प्रतिनिधी)


जिल्हा परिषद अंतर्गत पद भरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विषय शिक्षकांच्या रिक्त पदावर तातडीने नियुक्त्या करण्याचे आदेश शिक्षण संचालक प्राथमिक विभाग यांनी दिले असुन या जागा भरण्यात याव्यात यासाठी प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून रिक्त पदे भरण्याची मागणी केली होती. माजी मंत्री क्षीरसागर यांनी शिक्षण संचालक यांना तातडीने पाठपुरावा करून बीड जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त पदावर नियुक्त्या कराव्यात अशी मागणी केली होती.त्यानुसार आता या जागा भरण्याची प्रक्रिया होणार आहे.

बीड जिल्ह्यात जळवपास ४५० विषय शिक्षक ज्यात गणित,विज्ञानची रिक्त पदे आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सन २०१४ पासून प्राथमिक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवण्यात आलेली नाही. परिणामी ग्रामीण भागात उच्च प्राथमिक शिक्षणाचे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.ही बाब संघटनेचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी आणि पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून ही बाब निदर्शनास आणून दिली. शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्याशी तातडीने संपर्क साधून मंजी मंत्री क्षीरसागर यांनी बीड जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश देण्याची विनंती केली. त्यानुसार शिक्षण संचालक यांनी जिल्हा परिषद अंतर्गत पदभरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विज्ञान व गणित विषयाचे विषय शिक्षक पदोन्नती प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहेत.कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी रिक्त पदांच्या मर्यादेत सेवाजेष्ठता शिक्षकांमधुन गुणवत्तेनुसार इयत्ता ६ वी,७ वी,८ वी करीता विषय शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबवण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

# बीड जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांनी पोट फाडून पिशवी काढण्याचा बाजार मांडला आहे प्रा सौ विद्याताई जाधव

जिल्हा शालेय चिकित्सक डॉ अशोक बडे यांना काहीही देणे घेणे नाही बीड जिल्हा रुग्णालयामध्ये गेल्या एक वर्षभरामध्ये खाजगी गुत्तेदार आणि कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे पोस्टर जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात लावणार...

बीड जिल्ह्यामध्ये सध्या खाजगी रुग्णालयामध्ये महिलांचे पोट फाडून त्यातील पिशवी काढण्याचे रॉकेट सक्रिय झाला आहे याच्यावर काही प्रमाणात राज्य सरकारच्या वतीने आरोग्य विभागाचे वतीने बंधने घातले आहेत मात्र सर्व नियोजन हे अगदी परफेक्ट पद्धतीने राबवलं जात आहे खाजगी हॉस्पिटल मधून जिल्हा शालेय चिकित्सक यांच्याकडे रिपोर्ट पाठवला जातो आणि त्यावर जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांची परवानगी घेतली जाते मात्र हे रिपोर्ट खरे आहेत का खोटे आहेत याची कोणतीही शाश्वती तपासणी जिल्हा रुग्णालयाचे वतीने होत नाही विशिष्ट प्रकारची एजंट येतात या डॉक्टरांनी पाठवला आहे या या हॉस्पिटलची फाईल आहेत त्यावर सीएस सर ची सिग्नेचर पाहिजे आहे सांगितलं जातं ना पण ते रिपोर्ट बघितले जातात ना कोणती फाईल वाचली जाते आहे ना पेशंटला समोर आणलं जात आहे खाजगी हॉस्पिटल कडून जिल्हा चिकित्सक यांना फाईल दाखवली जाते त्यावर सिग्नेचर घेऊन दिवसाढवळ्या गरज असणारे आणि गरज नसणाऱ्या कोणत्याही रुग्णांची चौकशी न करता त्यांना पोट फाडून पिशवी काढण्याची परवानगी दिली जाते अंदाजे कमीत कमी ३५ ते ५० हजार रुपये खर्च या अशाच प्रक्रियेसाठी येतो यामुळे महिलांमध्ये कायमस्वरूपी आजारी पडण्याचा किंवा जीव जाण्याचा धोका असतो कायमस्वरूपी अधोपणा येतो अपंगपणा येऊ शकतो याची कोणतीही जबाबदारी जिल्हा शालेय चिकित्सक किंवा शासकीय यंत्रणा घेताना दिसत नाहीत जिल्हा रुग्णालयामध्ये हजारो कोटी रुपयांचे करोडो रुपयांचे बजेट सातत्याने आरोग्य विभागाला मिळते मग या बजेटचा काय होतो कुठे जातो याचा जर फायदा ग्रामीण भागातील शहरी भागातील महिलांना रुग्णांना होत नसेल तर उपलब्ध असलेल्या यंत्रणा फक्त दसऱ्याच्या दिवशी पुजण्यासाठी ठेवले आहेत का? जिल्हा रुग्णालयामध्ये ओपीडी बेस मध्ये कोणतेही डॉक्टर बसत नाहीत कोणतेही तपासणी वेळेवर होत नाही त्यामुळे लोकांना खाजगी रुग्णालयामध्ये जाण्याशिवाय पर्याय नाही खाजगी रुग्णालय मध्ये गेल्यानंतर रुग्णांच्या जीवाशी दिवसाढवळ्या खेळला जात आहे शासकीय रुग्णालयामध्ये तपासण्या होत नाहीत



म्हणून खाजगी रुग्णालयात रुग्ण जातात आणि खाजगी रुग्णालयात बळीचा बकरा म्हणून दिवसाढवळ्या त्याची कत्तल करतात या सर्व विषयांचे रुग्णांचे जीवाचं काहीही देणंघेणं जिल्हा शालेय चिकित्सक डॉक्टर अशोक बडे आणि जिल्ह्याच्या जिल्हा प्रशासनाला दिसत नाही आज एक वर्ष होत आलं जिल्हा रुग्णालयाचा कारभार हाती घेतला आहे अद्याप पर्यंत एकाही खासगी रुग्णालयाची चौकशी किंवा तपासणी डॉक्टर बडे यांनी करतानी दिसली नाही बघितली नाही किंवा कुठे दैनिकांमधून वाचलं नाही हॉस्पिटलमध्ये डॉक्टर बडे यांना निवेदन घेऊन भेटण्यासाठी पेशंटच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी गेलो तर चार दिवस सुट्टीवर आहे दोन दिवस बाहेर गेलेले आहेत औरंगाबादला गेलेले आहेत मुंबईला गेलेले आहेत अशा पद्धतीची माहिती मिळते त्यामुळे माझे जिल्हाधिकारी आणि आरोग्यमंत्री यांना विनंती आहे बीड जिल्ह्यामध्ये कायमस्वरूपी जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उपस्थित असणारा अधिकारी बीड जिल्ह्याला द्या किंवा रुग्णांची काळजी असणारा अधिकारी जिल्हा प्रशासनाला मिळावा कमिशन आणि टक्केवारीसाठी काम करणाऱ्यांना जिल्ह्यातून हद्दपार केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाहीत जिल्हा प्रशासनाला आणि आरोग्यमंत्र्यांना आमचा इशारा आहे लवकरात लवकर जिल्हा रुग्णालयातील या परिस्थितीचा चेहरा मोहरा नाही बदलला तर गेल्यावर्षभरामध्ये जिल्हा शालेय चिकित्सक यांनी वेगवेगळ्या माध्यमातून केलेले घोटाळ्याचे पोस्टर जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात लावले जातील असा इशारा प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या बीड जिल्हा अध्यक्ष सौ विद्याताई जाधव चौरे यांनी दिला आहे



**आगामी विधानसभेच्या तयारीसाठी धिरडी तालुका आष्टी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे आष्टी णटोदा शिरूर विधानसभेचे अध्यक्ष युवा नेते राम खाडे यांनी गावकऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा करून संवाद साधला यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगा आबा आजबे युवा नेते दीपक खिळे संपत वाळके शरद खोटे गणेश काळे वैजिनाथ काळे मेजर सोमनाथ खिळे मल्हारी खिळे अमोल सरोदे सह मान्यवर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे**

# पारगाव येथे स्वाभिमानी रिपब्लिकन सेना शाखा उद्घाटन सोहळा थाटात संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील माली पारगाव येथे स्वाभिमानी रिपब्लिकन सेना शाखेचा उद्घाटन सोहळा सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या हस्ते मोठ्या थाटात संपन्न झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाऊलखुणा प्रामाणिकपणे जोपासणारे बीड जिल्ह्यातील स्वाभिमानी नेते विजय साळवे यांच्या नेतृत्वावर प्रभावी होवून येथील तरुण तडफदार भीम सैनिकांनी साद घातली व दिनांक १८ जुलै गुरूवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक माली पारगाव येथे स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या बोर्डाचे अनावरण संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या हस्ते करण्यात आले व भिम नगर येथे स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे कोअर कमिटी सदस्य बालासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभेचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पंडित ओव्हाळ अंजेराम घनघाव विशाल ससाणे धम्मा गावडे शेख मजहर विश्वनाथ तोडके भास्कर पौळ साहेबा



टाकणखार शेख अर्शद विलास खळगे सय्यद अन्वर आनंद साळवे कादिर कुरेशी भगवान निर्मळ सोनाजी गायकवाड यांची उपस्थिती होती.

शाखेच्या अध्यक्षपदी सिध्दार्थ गाडेकर उपाध्यक्षपदी परमेश्वर पट्टेकर सचिवपदी साईप्रसाद चोपडे सहसचिव रोहन गाडेकर संघटक सुनील चोपडे सहसंघटक कर्तव्यश गाडेकर कोषाध्यक्ष विनायक चोपडे सहकोषाध्यक्ष सुमित गाडेकर संरक्षण प्रमुख राहुल चोपडे अक्षय गाडेकर व सल्लागार सखाराम चोपडे सचिन गाडेकर बबन चोपडे विलास चोपडे केशव चोपडे तर सदस्यपदी महेश चोपडे अतुल क्षीरसागर अजिंक्य चोपडे महेश गाडेकर रोहित गाडेकर अभिषेक गाडेकर कार्तिक गाडेकर तुषार साळवे लखन साळवे संदीप गाडेकर केतन चोपडे विलास चोपडे विशाल गाडेकर संजय चोपडे प्रशांत पटेकर भीमा चोपडे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन प्रभाकर चोपडे भिमराज मित्रमंडळ भिमनगर माली पारगावच्या वतीनं करण्यात आले होते सूत्रसंचालन वैजनाथ गडशिंग यांनी केले

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT